**वि.दि.दा.क्र. ०९/२०१६**
**CNRNOMHOS120002412016**
**शालीनी वि. अदिनाथ व इतर**
**नि.क्र. ९२ खालील आदेश**
**(आदेश दि.०४/०५/२०२४)**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दुय्यम उपनिबंधक, भुम यांना साक्षी पुराव्यासाठी स्वतः हजर राहुन साक्षीस येताना वादींनी त्यांच्या कार्यालयाला दिनांक १०.०३.२०१६ रोजी पाठविलेला मुळ अर्ज व त्या मुळ अर्जाच्या इतर नोंदी संबधी नोंद वही इत्यादी कागदपत्रे साक्षीस येताना घेवून येण्यासाठी समन्स काढण्याकरीता दिलेला आहे.

२. प्रतिवादीने अर्जास हरकत घेतली आहे की, उपनिबंधक यांनी सदर कागदपत्र नोंद न केल्यामुळे साक्षीदाराला समन्स काढण्याची गरज नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने दस्त ऐवज यादी नि.क्र.६५/२ येथे उपनिबंधक, भुम यांना दिलेल्या तक्रारी अर्जाची छायांकित प्रत दाखल केली आहे. त्यामुळे निश्चितच वादीला त्या कागदपत्रासंबंधात साक्षीदारांना तपासून पुरावा सादर करता येतो. त्याचप्रमाणे, पक्षकाराने त्याची केस शाबीत करण्यासाठी कोणते साक्षीदार तपासायचे व कसा पुरावा सादर करायचा हा त्या पक्षकाराचा महत्वाचा हक्क असतो. सबब, प्रस्तुतचा अर्ज या कारणास्तव मंजुर करण्यास पात्र आहे. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. ९२ मंजुर करण्यात येतो.
२. दुय्यम उपनिबंधक, भुम यांना तोंडी साक्ष देण्यासाठी तसेच साक्षीस येताना वादीने या कामी सादर केलेल्या दस्त ऐवज यादी नि.क्र. ६५/२ येथील

अर्जाच्या छायांकित प्रती बाबतीतील मुळ अर्ज व त्या मुळ अर्जाची घेतलेली नोंदीची नोंदवही व त्या अनुषंगाने कार्यालयातील इतर काही कागदपत्र असल्यास ती सोबत घेवुन येण्यासंबंधी साक्ष समन्स वादीने नियमानुसार असलेला साक्ष भत्ता जमा केल्यावर काढण्यात यावे.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत वादी यांनी सोसण्याचा आहे.

स्वा/-०४.०५.२०२४

दिनांक – ०४/०५/२०२४

(श्री. ए. पी. कुलकर्णी)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 04/05/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 04/05/2024 |
| Order uploaded on | --- | 04/05/2024 |